| | | |
|---|---|---|
| | **पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-१, पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय पत्ता- प्रिमियर कंपनीच्या शेजारी, जुना पुणे-मुंबई रस्ता, चिंचवड, पुणे १९** | |

**प्रेस नोट**

**दिनांक २१/०१/२०२३**

**किरकोळ वादातुन मित्राचा खुन करुन पळुन जाण्याचे तयारी असणारे आरोपीस तांत्रिक तपासाचे आधारे ०४ तासात जेरबंद : महाळुंगे पोलीसांची कामगिरी**

---

महाळुंगे पोलीस चौकी हद्दीमध्ये रात्रगस्त करणारे पो.शि/बाळकृष्ण पाटोळे व पो.शि/शरद खैरे यांना मौजे-महाळुंगे, ता-खेड, जि-पुणे गावचे हद्दीत हिंगलाज स्टोअर्स दुकानासमोर एक ३५ वर्षीय इसमाचे डोक्यात दगड टाकुन त्याचा खुन केलेल्या अवस्थेतील प्रेत मिळुन आले. घटनास्थळाचे आजुबाजुचे लोकांकडे तपास करता खुन झालेल्या इसमाचे नाव दिपक काशिराम राठोड, वय अंदाजे ३५ वर्ष रा-वाशिम असे असल्याचे निष्पन्न झाल्याने अज्ञात आरोपी विरुध्द चाकण पोलीस स्टेशन अंकित महाळुंगे पोलीस चौकी येथे **गुन्हा रजि.नंबर ११८/२०२३ भा.द.वि. कलम ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.**

महाळुंगे पोलीस चौकीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री ज्ञानेश्वर साबळे, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री किशोर पाटील यांनी लागलीच घटनास्थळी भेट देवुन गुन्हे शोध पथकातील अंमलदार यांना अज्ञात आरोपीचे शोधा करीता सुचना व मार्गदर्शन केले.

मयत दिपक काशिराम राठोड हा आरोपी- विठ्ठल मंगेश चव्हाण वय २२ वर्ष, मुळगाव आंधबोरी, ता-किनवट, जि-नांदेड याचे सोबत महाळुंगे येथे रुम करुन राहत असल्याचे व ते दोघेजन रात्री दारु पिवुन एकत्र चायनिज गाडयावर जेवणासाठी आले असता त्यांचेमध्ये किरकोळ कारणावरुन वाद झाला असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार तांत्रिक तासाचे आधारे आरोपी विठ्ठल मंगेश चव्हाण शोध घेत असताना तो नांदेड येथे मुळगावी पळुन जाण्याचे तयारी असताना मिळुन आला. त्यास ताब्यात घेवुन तपास करता त्याने किरकोळ वादातुन मयत दिपक राठोड याचे सोबत झटापट झालेवर त्यास रोडवर खाली पाडुन त्याचे डोक्यात दगड टाकुन त्याचा खुन केला असल्याची कबुली दिली. त्यास दिनांक २०/०१/२०२३ रोजी ११:३० वा अटक करण्यात आली आहे. सध्या सदरचा आरोपी दिनांक २४/०१/२०२३ पावेतो पोलीस कस्टडीमध्ये आहे.

**अटक आरोपीचे नाव –**

**विठ्ठल मंगेश चव्हाण,** वय २२ वर्ष, मुळगाव आंधबोरी, ता-किनवट, जि-नांदेड

सदरची कारवाई मा.पोलीस आयुक्त **श्री.विनयकुमार चौबे,** मा. पोलीस सह आयुक्त **श्री.मनोज लोहिया,** मा.अपर पोलीस आयुक्त **श्री.संजय शिंदे,** मा.पोलीस उप-आयुक्त परिमंडळ-१ **श्री विवेक पाटील,** सहाय्यक पोलीस आयुक्त, चाकण विभाग **श्रीमती प्रेरणा कट्टे,** वरीष्ठ पोलीस निरीक्षक **श्री ज्ञानेश्वर साबळे,** पोलीस निरीक्षक (गुन्हे) **किशोर पाटील** यांचे सुचना व मार्गदर्शनानुसार पोलीस उपनिरीक्षक **दिनेश चव्हाण,** पोलीस अंमलदार **राजु राठोड, विठ्ठल वडेकर, प्रशांत ठोंबरे, संतोष काळे, शिवाजी लोखंडे, शरद खैरे, बाळकृष्ण पाटोळे, सचिन माने, भाग्यश्री जमदाडे** यांनी केली असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक **किशोर पाटील** हे करीत आहेत.

( विवेक पाटील )
पोलीस उप आयुक्त,परिमंडळ १
पिंपरी चिंचवड शहर